राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या **सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबवावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम .......**

सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२६/प्र.क्र.०२/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १५/०७/२०२६
ई-मेल - sec.mh@gov.in

प्रति
जिल्हाधिकारी *(सर्व)*,
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :-** राज्यातील **बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील** सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित **ग्रामपंचायतींच्या** सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबवावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम .......

संदर्भ :-१.राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२५/प्र.क्र.०३/का-८,दि.२६/०५/२०२६ आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आदेश व दिनांक २३/०६/२०२६ चे सुधारीत आदेश तसेच दिनांक ०९/०७/२०२६ चे पत्र

२. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाची दिनांक १५/०७/२०२६ ची मतदार यादी ग्राहय धरण्याची अधिसूचना

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

राज्यातील बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी दिनांक २६/०५/२०२६ रोजी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार दिनांक १२/०६/२०२६ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन दिनांक १७/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसुचनेस मान्यता देवून दिनांक १९/०६/२०२६ रोजी सुमारे १५२४५ ग्रामपंचायतींपैकी सुमारे १५१५५ ग्रामपंचायतींची प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करण्यात आल्याचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाला आहे. दिनांक १०/०७/२०२६ रोजी अंतिम अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

उक्त कार्यक्रमानुसार **ज्या ग्रामपंचायतीमध्ये चुकीच्या पध्दतीने जागा आरक्षित केल्यामुळे तसेच काही ग्रामपंचायती अनावधानाने आयोगाने दिनांक २६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आरक्षण सोडत कार्यक्रमातून वगळण्यात आलेल्या आहेत, केवळ अशा ग्रामपंचायतींसाठी दिनांक २३/०६/२०२६ रोजी सुधारित आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आलेला आहे.** या कार्यक्रमानुसार दिनांक २९/०६/२०२६ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन दिनांक ३०/०६/२०२६ रोजी प्रारुप अधिसुचनेस मान्यता देवून दिनांक १३/०७/२०२६ रोजी अंतिम अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०८/०७/२०२६ च्या पत्रान्वये उक्त दोन्ही कार्यक्रमानुसार अतिवृष्टीमुळे दिनांक १०/०७/२०२६ व दिनांक १३/०७/२०२६ रोजी अंतिम अधिसूचना प्रसिध्द न करता आल्यास तसेच उपविभागीय अधिकारी यांनी ज्या ग्रामपंचायतींमध्ये पुन:श्च सोडत काढण्याचे अभिप्राय दिलेले आहेत, अशा ग्रामपंचायतींसाठी दिनांक २४/०७/२०२६ पर्यंत अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.

**आता, या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.**

**या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक १५/०७/२०२६ आदेशान्वये दिनांक १५/०४/२०२६ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी वापरण्यात येणार आहे.**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० अ(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, राज्यातील **बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील** सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित **ग्रामपंचायतींच्या** सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकप्रणालीव्दारे आदेशातील मुद्दा क्र.३ नुसार प्रभागनिहाय मतदार यादी तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :-

<u>आदेश</u>

१) **मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती** -

राज्यातील **बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील** सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित **ग्रामपंचायतींच्या** सार्वत्रिक निवडणुकांसाठी **दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्यात यावी. या निवडणूकांसाठी संगणकप्रणालीव्दारे** मतदार याद्या तयार करण्यात याव्यात.

२) **संगणक प्रणालीव्दारे मतदार याद्या तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबावी** -

- महाआयटी यांच्याकडून विकसित करुन घेण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमधून प्रभागनिहाय प्रारुप व अंतिम मतदार यादी तयार केली जाते त्याची link खालीलप्रमाणे आहे.

  URL: https: //mahasecvoterlist.in

- राज्य निवडणूक आयोगाकडून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय यांना दिलेला <u>युजर आयडी व पासवर्ड</u> वापरुन जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून तहसील कार्यालयांसाठी <u>युजर आयडी व पासवर्ड</u> तयार करण्यात यावेत.
- संबंधित तहसील कार्यालयाने ग्रामपंचायतनिहाय खालीलप्रमाणे मास्टर डेटा भरणे.
  १. असेंब्ली मास्टर (विधानसभा क्रमांक)
  २. वॉर्ड मास्टर (एकूण प्रभागांची संख्या)
- सॉप्टवेअरमधील <u>Mother Roll</u> या पर्यायातून, आयोगाने निश्चित केलेल्या मतदार यादी ग्राहय धरण्याच्या दिनांकानुसार, यादी भाग निहाय PDF यादी प्राप्त करुन घेणे

- सदर यादी भाग निहाय मदर रोल, PDF च्या आधारे, (Control Chart) तयार करणे. त्यामध्ये मतदार कोणत्या प्रभागात राहतो हे नमूद केले जाते.
- या Control Chart मध्ये विधानसभा क्रमांक, यादी भाग क्रमांक, अनुक्रमांक आणि संबंधित प्रभाग क्रमांक नमुद असतो.
- सामान्यत: एक ग्रामपंचायतीसाठी एकच Control Chart तयार होतो. परंतु, एका ग्रामपंचायतीत दोन विधानसभा क्रमांक असल्यास विधान सभा क्रमांकानुसार दोन Control Chart तयार करावे लागतात.
- तयार केलेला Control Chart अपलोड करण्यात करणे.
- पुढे प्रोसेस रिक्वेस्ट या टॅब मधून प्रोसेस करणे. प्रोसेस पुर्ण झाल्यानंतर डाऊनलोड PDF या टॅब मधून प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीची PDF प्राप्त करुन घेणे.
- प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर, आयोगाकडून दिलेल्या मतदार यादीच्या कार्यक्रमातील दिनांकानुसार प्रारुप मतदार यादीवर प्राप्त हरकती व सूचनांचा निर्णय घेऊन अंतिम मतदार यादी तयार करण्यासाठी फक्त हरकतींचा Control Chart अपलोड करणे व प्रोसेस करुन सदर अंतिम मतदार यादी प्राप्त करुन घेणे.

**३) मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| | | |
|---|---|---|
| मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | बुधवार | दिनांक १५ एप्रिल,२०२६ |
| १) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार | दिनांक २४/०७/२०२६ |
| २) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | शुक्रवार<br>बुधवार | दिनांक २४/०७/२०२६ ते<br>दिनांक २९/०७/२०२६ पर्यंत |
| ३) प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | मंगळवार | दिनांक ०४/०८/२०२६ |

**संबंधित जिल्हाधिकारी यांना राज्य निवडणूक आयोगाकडून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त होताच त्यांनी तहसिलदार यांना युजर आयडी व पासवर्ड तयार करुन द्यावेत. संबंधित तहसिलदार यांनी दिनांक २०/०७/२०२६ पर्यंत संबंधित ग्रामपंचायतींची माहिती व मास्टर डाटा भरणे.**

**४) प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे -**

**संबंधित तहसिलदार यांनी मदररोल डाऊन लोड करुन कंट्रोल चार्ट करणे व सदर कंट्रोल चार्ट प्रोसेस करुन दिनांक २३/०७/२०२६ पर्यंत प्रारुप मतदार यादी तयार करणे.**

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची दक्षता घ्यावी :-

अ) राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का.०८, दिनांक १६/०७/२०२५ व दिनांक २९/१०/२०२५ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकरीता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार मतदार यादी विभाजनाची कार्यवाही करावी.

आ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या अधिक त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

इ) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही, याची कृपया नोंद घ्यावी. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

५. **प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी **प्रारुप मतदार यादीला दिनांक २४/०७/२०२६ रोजी व्यापक प्रसिध्दी** देण्यात यावी .

६. **प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

६.१ **दिनांक २४/०७/२०२६ ते दिनांक २९/०७/२०२६ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर** नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

६.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्याच सुधारणा मतदार यादीत कराव्यात ,जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत. **यासाठी दिनांक ०३/०८/२०२६ पर्यंत कंट्रोल चार्ट प्रोसेस करुन अंतिम मतदार यादी तयार करणे.**

७. **प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना **दिनांक ०४/०८/२०२६ रोजी मुद्दा क्र.८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द** करण्यात यावी.

८. **प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-**

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकावर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक केबल टि. व्ही.

९. **वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.** (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि.२४/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)

१०. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या **मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.**

११. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१२. सदर **प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(स्वाक्षरी) २५.०८.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत: परिशिष्ट

प्रत:- १. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

**वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायतींबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.**

२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

३. सर्व विभागीय आयुक्त

४. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

५. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

७. संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

८. कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग(का.१४) यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात उचित कार्यवाहीसाठी.

९. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

१०. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

११. निवड नस्ती.

(परिशिष्ट)

आयोगाचे क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०२६/प्र.क्र.०२/का-८, दिनांक १५/०७/२०२६ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र.

राज्यातील **बिगर व अंशत: अनुसूचित क्षेत्रातील** सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या, नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकप्रणालीव्दारे राबवावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम

## मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक १५/०४/२०२६

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार दिनांक २४/०७/२०२६ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | शुक्रवार दिनांक २४/०७/२०२६ ते<br>बुधवार दिनांक २९/०७/२०२६ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | मंगळवार दिनांक ०४/०८/२०२६ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१५.०७.२०२६

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र